# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १७.०५.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**पारडी पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरीचे गुन्हयातील ईतर तीन आरोपींना अटक, मुद्येमाल जप्त.**

दिनांक ०९.०५.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, फिर्यादी अथर्व गौरीशंकर म्हस्के वय २१ वर्षे रा. प्लॉट. १०५, सर्जा टाऊन मागे, वैष्णोदेवी नगर, भांडेवाडी, नागपुर हे त्यांचे ओला इलेक्ट्रीक गाडी क्रमांक एमएच ४९ सीएच ३९६० ने रॅपीडो बुकींगचे कामाकरीता पोलीस ठाणे पारडी हद्दीत उमिया धाम मंदीरजवळील नाल्याजवळून जात असता, घटनास्थळी उभ्या असलेल्या तीन अनोळखी मुलांनी त्यांना थांबवून यहा क्या कर रहा असे म्हणून हातबुक्कीने मारहाण करुन तेरे पास के पैसे निकाल असे म्हणून फिर्यादीचे खिशातील ०२ मोबाईल फोन व रोख ४,०००/— रू. असा एकूण १८,०००/— रु. चा मुद्येमाल जबरीने हिसकावुन पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(६),३५१(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून आरोपींना निष्पन्न करून, सापळा रचुन आरोपी नामे १) रोहीत रतिराम रहांगडाले वय २१ वर्षे २) समीर उमाजी लांबट वय १९ वर्षे दोन्ही रा. शिवछत्रपती नगर, वाठोडा ले आऊट, खरबी, नागपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेली स्प्लेंडर प्लस गाडी व सुझुकी ॲक्सेस गाडी, ०२ मोबाईल फोन व रोख ५००/—रू. असा एकुण १,३०,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करुन पुढील तपासकामी पारडी पोलीसांचे ताब्यात दिले होते.

पारडी पोलीसांनी आरोपींची अधिक सखोल चौकशी करुन त्यांचे इतर साथीदार १) प्रज्वल रंजीत नेवारे वय १९ वर्ष रा. शिवणकर नगर झोपडपटफटी, समाजभवन जवळ, नंदनवन, नागपूर २) तुषार गणपत गहुकर वय २० वर्ष ३) दर्शन दिवाकर दुधकवडे वय १९ वर्ष दोन्ही रा. गडेगाव, पोस्ट खामगाव, ता. सावनेर जि. नागपूर यांना ताब्यात घेतले. आरोपींचे ताब्यातुन ०३ मोबाईल फोन, पल्सर २२० मोटार सायकल क्र. एमएच ४० बीएच ५०५५ असा २,१०,०००/— रु. चा तसेच यापुर्वी जप्त केलेले ०२ मोबाईल फोन, रोख ५०० रु. स्प्लेंडर प्लस मोटारसायकल क्र. एमएच ४९ बीयू ६६७९, सुझुकी ॲक्सेस मोपेड क्र. एमएच ४९ बीडी १४८४ असा एकूण ३,४०,५००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयामध्ये एकूण ०५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. संदीप पखाले, पोलीस उपआयुक्त (परि.क्र. ५), मा.श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री सुनिलकुमार काकडे, दुपोनि श्री विवेक भारती, सपोनि गजानन कंकाळ, प्रशांत भागवत, पोएपनि अरविंद कोल्हारे, पोहवा पप्पु यादव, संदीप लांडे, पोअं.

प्रसन्नजीत जांभुळकर, भुषण झरकर, निखिल मोहीते, योगेश बोरेकर, गौरव युवते, मनिष तिवारी व धनराज उमरेडकर यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १६.०५.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, चिचभवन येथे एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, क्राऊन को—ऑपरेटीव्ह सोसायटी समोर, चिचभवन येथे एक ईसम आरडाओरडा करतांना दिसून आला. तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राजेश बुधराम मरकाम वय ४८ वर्षे रा. महाकाली नगर झोपडपट्टी, बेलतरोडी रोड, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती अंदाजे २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोतवाली :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १६.०५.२०२६ चे २१.०० वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत, दसरा रोड, मांगपुरा, कोतवाली येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती वैशाली रमेश मेश्राम वय ३५ वर्षे हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाकडे जेवणाकरीता गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, देवघरातील लोखंडी आलमारीतील रोख ७,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,६०,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे पोउपनि. महेश जगताप ९४०४६४३१९९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे बेलतरोडी :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी श्रीमती शिल्पा अमरिश मोडक वय ३७ वर्ष रा. जोगीनगर, गली क्र. ८, अजनी, नागपूर यांची ओळख आरोपी १) राहुल शंकर पराते वय ३४ वर्ष रा. प्लॉट क्र. ६०५, शिव इलाईट, शंकरपूर, नागपूर २) सुरेश गंगाधर पाटील वय ४१ वर्ष रा. संतोषनगर, विनोबा भावे नगर, नागपूर ३) भुषण रमेश कटके रा. सुर्योदय आदिवासी महिला मंडळ, कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर यांचे सोबत झाली होती. आरोपी यांनी त्यांचे पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, वेळाहरी येथे यशोदा मतिमंद मुला—मुलींची निवासशाळा असल्याचे फिर्यादी यांना खोटे सांगितले. व अशाच प्रकारच्या इतरही दोन शाळा असल्याचे फिर्यादीस खोटे सांगून, कट रचून नमुद शाळांना शासनामार्फत अनुदान प्राप्त झालेले आहे असे सांगून फिर्यादीस शाळेत नौकरी लावून देण्याचे आमिष दाखवून कायमस्वरुपी शासकीय नौकरी व पगार मिळेल असे प्रलोभन दाखविले. आरोपींनी दिनांक ०७.१०.२०२२ ते माहे फेब्रुवारी २०२४ दरम्यान फिर्यादीकडून नौकरी लावून देण्याकरीता वेळोवेळी एकूण ८,००,०००/— रु. घेतले. आरोपींनी फिर्यादीकडुन रक्कम घेवुन फिर्यादीस कोणतीही नौकरी लावून न देता तसेच फिर्यादी यांनी त्यांची रक्कम परत मागीतली असता, रक्कम परत न करता त्यांचा अन्यायाने विश्वासघात करुन फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. शिरीष सलगर ९६७३९९१४०७ यांनी आरोपीविरूध्द कलम ४२०,४०६,१२०(ब) भांदवि अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे कपीलनगर</u> :—** मेघा महेश कांबळे/गवई वय ३१ वर्षे रा. ह.मु. शासकीय महिला भिक्षेकरी स्विकार केंद्र, पाटणकर चौक, नागपूर हया दिनांक १३.०५.२०२६ रोजी ०६.१५ वा. नजर चुकवून पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीतून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, केस—काळे, उंची ५ फुट ३ इंच, अंगात— पिवळया रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. ओळख— हनुवटीवर तिळ आहे.



मेघा

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**